# जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

---

## सफाईगार पदासाठी भरती प्रक्रिया
## उमेदवारी अर्ज

| उमेदवाराने नुकतेच काढलेले छायाचित्र येथे चिकटवून त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी. |
|---|

| नोंदणी क्रमांक (कार्यालयीन उपयोगाकरीता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|

०१. उमेदवाराचे नांव :—
(आडनाव प्रथम)

०२. पत्रव्यवहाराचा पत्ता :—
पिनकोड क्रमांकासह

०३. संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक :—

०४. ई मेल, असल्यास :—

०५. सेवायोजन कार्यालयातील / प्रादेशिक :—
रोजगार विनिमय नोंदणी क्रमांक, असल्यास

०६. लिंग :— पुरूष / स्त्री / अन्य

०७. उमेदवार दिव्यांग आहे काय ? :— होय / नाही

०८. उमेदवार सध्या शासकीय सेवेत आहे काय ? :— होय / नाही

०९. उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय ? :— होय / नाही

१०. उमेदवाराची जात व प्रवर्ग :— जात प्रवर्ग

११. जन्मदिनांक :— दिनांक महिना वर्ष

१२. उमेदवाराचे जाहिरातीचे दिवशीचे वय :— वर्षे महिने दिवस
(दि.१६/१२/२०१९ रोजीचे)

१३. उमेदवार विवाहीत आहे काय ? :– होय / नाही

१४. उमेदवारास मराठी लिहिता / :– होय / नाही
वाचता येते काय ?

१५. शैक्षणिक पात्रतेचा तपशिल :–

| अर्हता | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त गुण | कमाल गुण | प्राप्त गुणांची टककेवारी | ग्रेड | किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

१६. अन्य अर्हता, जसे संगणक / :–
टंकलेखन / लघुलेखन, :–
असल्यास तपशिल.

१७. उमेदवारास कामाचा पुर्वानुभव:–
आहे काय, असल्यास तपशिल.

१८. न्यायसंस्थेत कार्यरत नातेवाईकांचा :–
संपूर्ण तपशिल, असल्यास.

१९. उमेदवारांस ओळखत असलेल्या :– १.
दोन जबाबदार व्यक्तींची नांवे :–
व पत्ता. २.

२०. उमेदवारावर पुर्वी फौजदारी खटला :—
/ शिस्तभंगाची कार्यवाही झाली होती
काय / शिक्षा झाली होती काय /
खटला / कार्यवाही प्रलंबीत आहे काय.
असल्यास तपशिल.

# घोषणा

१. मी वर नमुद उमेदवार याद्वारे घोषित करतो / करते की, प्रस्तुत अर्जात नमूद सर्व माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. वर नमुद माहिती अथवा माहितीचा कोणताही भाग चुकीचा / खोटा असल्याचे आढळून आल्यास मी प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी आपोआप अपात्र ठरेल आणि तसेच जर माझी निवड / नियुक्ती झाल्यास, कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय मला सेवेतून काढून टाकण्यात येईल हे मला मान्य आहे. मी असेही घोषित करतो / करते की, माझ्याविरूध्द यापूर्वी कोणताही फौजदारी खटला झालेला नाही आणि / अथवा सध्या प्रलंबीत नाही तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्हयात शिक्षा झालेली नाही. याशिवाय, माझेविरूध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रलंबीत नाही अथवा पूर्वी झालेली नाही.
२. दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्मास आलेल्या अपत्यामुळे जाहिरातीच्या तारखेस माझ्या जीवित अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असल्यास मी या पदासाठी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.
३. उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी / मुलाखतीस बोलाविले जाण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची मला जाणीव आहे.

दिनांक :— उमेदवाराची स्वाक्षरी :—

ठिकाण :— उमेदवाराचे नांव :—

————

# जि ल्हा व स त्र न्या या ल य, नं दु र बा र

---

## सफाईगार पदासाठी भरती प्रक्रिया
## उमेदवारांना सुचना

**०१ अर्हता :–**

**अ.** सुदृढ शरीरयष्टी आणि सफाईगार या पदाच्या कामासाठी सर्वार्थीने सक्षम असणे आवश्यक आहे.

**ब.** दिनांक २८–०३–२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकुण दोन पेक्षा जास्त नसावी.

**०२. वयोमर्यादा** :–

अ. उमेदवार सर्वसाधारण प्रवर्गाकरीता १८ वर्षपेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षपेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक २८–०३–२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या विशेष मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्षपेक्षा जास्त वयाचा नसावा.

ब. शासन निर्णय क्र.एसआरव्ही–१०७७/३५७६/१४३३/१६–अ, दिनांक २३–०५–१९७८ नुसार शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरिता सक्षम असतील तर, त्यांच्याबाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षपर्यंत शिथिल केलेली आहे.

**०३. कामाचे स्वरूप** :–

निवड झालेल्या उमेदवारास नंदुरबार जिल्हा न्यायिक विभागांतर्गत कोणत्याही न्यायालयात सफाईगार या पदावर नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती नंतर उमेदवारांस न्यायालयाच्या इमारतीची, परिसराची, निवासी कार्यालयांची व प्रसाधनगृहांची नियमित स्वच्छता व साफसफाई करणे आणि निगा राखणे ही कर्तव्ये पार पाडावी लागतील. तसेच अशा उमेदवारांना न्यायालयाच्या आवारातील जागेची निगा राखणेकामी आवश्यक ती सर्व कामे करावी लागतील. सफाईगार हे पद एकाकी असुन, पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असतीलच असे नाही, याबाबीची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

### महत्वाच्या सुचना

०४. अधिसूचित करण्यात आलेल्या पदाची संख्या ही सद्यस्थितीत मंजूर व रिक्त असलेल्या पदांच्या अनुषंगाने परिगणित केलेली असून, त्यात आवश्यकतेनुसार बदल होवू शकतो. अधिसूचित केलेल्या संख्ये एवढया उमेदवारांची निवड केली जाईलच असे नसून, निवड समिती, पात्र उमेदवारांची उपलब्धता आणि/अथवा अन्य समर्थनीय कारण आणि प्रशासकीय निकड विचारात घेवून अधिसूचित संख्येपेक्षा कमी/जास्त उमेदवारांची निवड करू शकते.

०५. सर्व उमेदवारांना सुस्पष्टपणे जाणीव दिली जाते की, त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून त्यांना चाचणी/मुलाखतीस बोलाविले जाण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. निवड समिती, प्रशासकीय निकड विचारात घेवून प्राप्त अर्ज लघुसूचित करू शकेल व लघुसूचित होण्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांचाच पुढील टप्प्यांसाठी विचार केला जाईल.

०६. **उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत त्यांची अर्हता दर्शविणा–या कोणत्याही दस्ताची प्रत जोडण्याची आवश्यकता नाही.** उमेदवारांना जाणीव दिली जाते की, त्यांनी सादर केलेली माहिती व अर्हता खरी व बरोबर असल्याचे गृहित धरून त्यांना, ते लघुसूचित होण्यास पात्र ठरले तर, चाचणी/मुलाखतीस बोलाविले जावू शकेल. दिलेली माहिती ही खोटी, सदोष अथवा चुकीची आहे असे आढळून आल्यास उमेदवारास केवळ अनर्ह

..२..

ठरविण्यात येईल असे नव्हे तर त्यांच्यावर खटलासुध्दा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परिक्षेस बसण्याची मनाई करण्यात येईल.

०७. अर्ज नोंदणीकृत/शिघ्र डाकेने किंवा हस्तप्रेषणाद्वारे (**सृट्टीचे दिवस वगळता**) स्विकारले जातील. **<u>साध्या टपालाने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाही.</u>**

०८. उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा न्यायालय, नंदुरबार च्या संकेतस्थळावरून डाउनलोड करून घेवून, केवळ ए–४ आकाराच्या, चांगल्या दर्जाच्या कागदावर, सुस्पष्ट व सुवाच्य हस्ताक्षरात भरून, **<u>दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत</u>** (**सृट्टीचे दिवस वगळता**) जिल्हा न्यायालयास प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार ता.जि. नंदुरबार, पिन क्र.४२५ ४१२ या पत्त्यावर सादर करावे. निर्दिष्ट वेळेनंतर प्राप्त अर्जाचा कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

०९. उमेदवारांनी आपल्या अर्जावर निर्दिष्ट जागी त्याचे/तिचे “पासपोर्ट” आकाराचे नविनतम छायाचित्र चिकटवावे आणि त्यावर आपली स्वाक्षरी करावी. स्वाक्षरीची सुरूवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशा रितीने स्वाक्षरी करावी.

१०. उमेदवारांनी आपल्या अर्जा सोबत स्वत:चा पत्ता असलेले आणि साध्या टपालाने पाठविण्यास पुरेसे टपाल मुद्रांक (तिकीट) लावलेले दुसरे एक पाकीट सादर करावे. उमेदवार लघुसुचित होण्यात यशस्वी ठरला तर त्यास त्याच पाकिटाद्वारे, साध्या टपालाने, पुढील चाचणीस्तव बोलाविले जाईल. लघुसुचित होण्यात यशस्वी ठरलेल्या उमेदवारांची नांवे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर आणि तसेच जिल्हा न्यायालय, नंदुरबारच्या सुचना फलकावर अधिसुचित केली जातील. पुढील चाचणीस्तव येण्याबाबतची सूचना साध्या टपालाद्वारे दिली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे त्याच्या हिताचे राहील.

११. लघुसुचित होण्यात यशस्वी ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर अधिसूचित केली जाईल. अशा उमेदवारांनी जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ओळखपत्राचा नमुना डाउनलोड करून घेवून, यथोचितरित्या भरून आणि त्यावर आपले नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (पूर्वी सादर केलेले) चिकटवून आणि त्यावर दिलेल्या जागी काळ्या शाईने स्वाक्षरी करून जिल्हा न्यायालयास दिलेल्या तारखांना सादर करावे आणि प्रवेश पत्र प्राप्त करून घ्यावे. ओळखपत्र सादर करतांना उमेदवाराने आपली ओळख पटविणारा कोणताही एक दस्त जसे की, आधारकार्ड, पारपत्र, वाहनचालकाचा परवाना, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड, छायाचित्र असेलेले ओळखपत्र इ. त्यांच्या मालकाने अथवा शैक्षणिक संस्थेने प्रदान केलेले सादर करावे.

१२. ऐन वेळेची घाई गर्दी टाळण्यासाठी उमेदवारांना असा सल्ला दिला जातो की, त्यांनी त्यांचे अर्ज पुरेसा कालावधी शिल्लक असतांनाच सादर करावे.

१३. जे उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत आहेत, त्यांनी त्यांच्या विभागाकडून त्यांच्या विभागास त्यांची उमेदवारी विचारात घेणेबाबत कोणतीही हरकत नसलेबाबतचे प्रमाणपत्र मिळवावे. त्यानंतर उमेदवाराने सदर प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस (ते मुलाखतीला पात्र ठरल्यास) सादर करावे.

१४. एका उमेदवाराने केवळ एकच अर्ज सादर करावा.

१५. अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज, जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशिलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल, बाद ठरविला जाईल आणि त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

१६. **<u>उमेदवाराने अर्जासोबत कोणतीही मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे अथवा त्यांच्या साक्षांकित प्रती पाठवू नयेत.</u>** उमेदवारांनी आपल्या माहिती व अर्हतेच्या पुष्ठीस्तव आवश्यक दस्तांच्या प्रती सादर करणेबाबत त्यांना योग्य वेळी सूचना दिली जाईल. मागणी केली जाईपर्यंत त्यांनी अशी कोणतीही कागदपत्रे न्यायालय अधिका—यांच्या हवाली करू नयेत.

१७. उमेदवाराची उच्च शैक्षणिक अर्हता आणि/अथवा निवड समिती ठरविल ते निकष लागू करून, त्यांची लघुसुची करण्याचा अधिकार निवड समितीस आहे.

१८. लघुसुचित होण्यात यशस्वी ठरलेल्या उमेदवारांची श्रमसाफल्य, क्रियाशिलता चाचणी व स्वच्छता चाचणी आणि तसेच निवड समितीने ठरविल्यानुसार अन्य सुयोग्य कोणतीही चाचणी घेतली जाईल व त्याबाबतच्या सुचना जिल्हा न्यायालय, नंदुरबारच्या संकेतस्थळावर आणि तसेच जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर दिल्या जातील. सबब, संबंधित उमेदवारांनी वेळोवेळी जिल्हा न्यायालय, नंदुरबारच्या संकेतस्थळास भेट देणे त्यांच्या हिताचे राहील. अशा चाचणीत यशस्वी झालेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविले जाऊ शकेल.

१९. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल त्यांनी मुलाखतीच्या वेळेस खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती आणि त्यांची मुळ कागदपत्रे जिल्हा न्यायालयाद्वारे निर्दिष्ट अधिका—याकडे सादर केले पाहिजेत.

अ) जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा/जन्माचा/एसएससीचा)
ब) दोन सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नांवे मूळ अर्जात नमूद केलेली आहेत, त्यांनी दिलेला, उमेदवाराचे चारित्र्य चांगले असल्याबाबतचा दाखला.
क) अर्हतेच्या रकान्यात नमूद केलेल्या अर्हता/परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.
ड) अन्य अर्हता या रकान्यात नमूद केल्यानुसार अर्हता/परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचा दाखला.
इ) संबंधित जिल्हा सरकारी रूग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागू असल्यास.
ई) शासनाने विहीत व प्राधिकृत अधिका—याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागू असेल तेथे.
उ) जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञपत्र, नमुना—ए, मूळ
ऊ) विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र, जर उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर.

२०. प्राप्त अर्जाची लघुसुची/चाचणी/मुलाखत (मौखिक चाचणी) इ. बाबींसाठी कमाल गुण आणि पुढील टप्प्यांसाठी यशस्वी होण्यासाठी ठरविण्यात आलेले निम्नतम पात्रता गुण (बेंच मार्क) ठरविण्याचा अधिकार निवड समितीस असून त्याबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

२१. उमेदवारांना चाचणी/मुलाखतीसाठी, जर बोलाविले गेले तर, निश्चित केलेल्या तारखांना आणि ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

२२. उमेदवाराने निवड प्रक्रिये संदर्भात स्वत: अगर इतर कोणाही मार्फत निवड समितीचे सदस्य, जिल्हा न्यायालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अनर्ह ठरविण्यात येईल व याबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

२३. निवड/नियुक्त्या हया काटेकोरपणे उमेदवारांना सर्व चाचणी आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात येणा—या गुणवत्ताक्रमानुसार करण्यात येईल.

..४..

२४. निवड/नियुक्त्या यादी ही माननीय उच्च न्यायालयाच्या मान्यतेस आधीन असले आणि माननीय उच्च न्यायालय विहित करील अशा कालावधीसाठी वैध राहील.

२५. **<u>या कार्यालयाने या भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही.</u>** ही भरती पूर्णपणे विनाशुल्क आहे. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की अर्ज दाखल करतेवेळी ते कोणत्याही प्रकारच्या शुल्कापोटी कोणतेही दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order), धनादेश (Cheque) इ. पाठविणार नाहीत.

२६. निवड झालेल्या उमेदवाराची सेवा ही आदरणीय उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे (governed) असेल. उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार अंशदान निवृत्ती वेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू असतील. उमेदवारांची सेवा त्यांच्याबाबत संबंधित पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून प्राप्त करवून घेतल्या जाणा—या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रास आधीन राहून असेल.

————

जाहिरात तारीख :– १६/१२/२०१९
अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख :– २३/१२/२०१९

# जाहिरात

जिल्हा न्यायालय, नंदुरबारच्या आस्थापनेवरील **सफाईगार** या पदाकरिता उमेदवारांची प्रतिक्षा/ निवड यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर.पी.ए.डी.) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह द्वारे **सफाईगार पदाकरिता अर्ज** असे लिफाफ्यावर लिहुन प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नंदुरबार (यानंतर ज्यास संक्षेपाकरिता जिल्हा न्यायालय असे संदर्भीत केले आहे) यांच्याकडे दिनांक **२३/१२/२०१९ रोजी सायंकाळी ०५–३० वाजेपर्यंत** अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

या तारखेनंतर आलेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठवलेले किंवा लिफाफ्यावर **"सफाईगार"** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**<u>सफाईगार</u>** :–
निवड/प्रतिक्षा यादीसाठी सफाईगार पदांची संख्या ०६

सफाईगार पदाच्या पात्रतेकरीता उमेदवार

**<u>अर्हता</u>** :–
शरीर प्रकृतीने सुदृढ असावा.

**<u>वयोमर्यादा</u>** :–

या जाहिरातीच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी नसावा. सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. मागास वर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा.

**<u>वेतनश्रेणी</u>** :–

सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस–१ या सुधारित वेतन संरचनेत रूपये १५,०००/– व अधिक नियमानुसार देय भत्ते.

**<u>उमेदवारांना सुचना</u>** :–

१. जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या–त्या विभाग / कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवुनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज आपापल्या विभाग / कार्यालय प्रमुखामार्फत **<u>पाठविण्याची आवश्यकता नाही.</u>**

२. उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका—यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

३. अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, नंदुरबारचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/nandurbar यावर उपलब्ध आहे. त्या नमुन्यातच अर्ज सादर करावा.

४. उमेदवाराने प्रमाणपत्रे अथवा प्रमाणपत्रांच्या प्रती अर्जास जोडू नयेत.

५. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की स्वाक्षरीची सुरूवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल.

६. उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला चालू किंवा प्रस्तावीत नसल्याचे प्रमाणीत करावे, असल्यास त्याचा तपशील द्यावा.

७. विहीत नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज रद्द करण्यात येईल.

८. निवड समिती समान निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व प्राप्त झालेल्या अर्जातील अल्पसुची जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथील नोटीस बोर्ड व https://districts.ecourts.gov.in/nandurbar या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

९. सफाईगार पदासाठी अल्पसुचीत नमुद उमेदवारांची २० गुणांची चापल्य व साफसफाई कामाचे मुल्यमापन परिक्षा घेण्यात येईल.

१०. सफाईगार पदासाठी चापल्य व साफसफाई कामाचे मूल्यमापन परिक्षेत पास झालेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

११. उमेदवारांना परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्वत:च्या खर्चाने हजर रहावे लागेल.

१२. सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाची सुचना आल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयाच्या सुचना पटलावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१३. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडण्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

**<u>सेवाप्रवेश प्रकियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल.</u>**

१. दिनांक २३/१२/२०१९ रोजी सायं.५.३० वाजेपावेतो अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख.

२. दिनाक ०४/०१/२०२० रोजी निवड समिती समान निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व प्राप्त झालेल्या अर्जातील अल्पसुची जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथील नोटीस बोर्ड व https://districts.ecourts.gov.in/nandurbar या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

३. दिनांक ०४/०१/२०२० रोजी अल्पसुचीमध्ये नांव असलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६/०१/२०२० ते दिनांक १३/०१/२०२० (सुट्टीचे दिवस वगळुन) या कालावधीत कार्यालयीन वेळेमध्ये शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती, फोटो ओळखपत्र जसे आधारकार्ड, पॅन कार्ड, वाहन परवानाची प्रत, दोन सन्माननीय व्यक्तींनी उमेदवाराचे चारित्र्य चांगले असल्याबाबतचा दिलेला चारित्र्याचा दाखला, शासन विहीत करेल त्या प्राधिका—याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागु असेल तेथे, कुटुंब लहान असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नमुना अ) जोडावा. उमेदवार शासकीय सेवेत असल्यास, विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र जोडावे, दाखल कराव्यात व ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे.

४. दिनांक १९/०१/२०२० रोजी सफाईगार पदासाठी २० गुणांसाठी मुल्यमापन चापल्य व साफसफाई परिक्षा सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० वाजे दरम्यान घेण्यात येईल.

५. दिनांक २२/०१/२०२० रोजी सफाईगार पदासाठी तोंडी मुलीखत करिता निवड झालेल्या उमेदवारांची यादी व मुलाखतीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, नंदुरबारचे सुचना पटलावर व संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

६. दिनांक २५/०१/२०२० रोजी सकाळी ११—०० वाजेपासुन जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

<u>महत्वाची सुचना</u> :—

१. “नोंदणी कमांक” हा अर्जातील रकाना कार्यालयाद्वारे भरण्यात येईल.

२. अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, नंदुरबारच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याप्रमाणेच असावा.

३. प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासुन ती फकत ०२ वर्षांच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

४. ओळखपत्र असल्याशिवाय चाळणी परिक्षा व इतर परिक्षेला बसण्यास परवानगी मिळणार नाही.

आदेशावरून,

सही/—

दिनांकः— १६/१२/२०१९.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नंदुरबार.